# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

**डॉ. संतोष परचुरे**
**संचालक**


संदर्भ क्र.: विविमं/२०२०–२१/३९ दिनांक : ३१.०७.२०२०

प्रति,
**मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर विभाग.

**विषय : विद्यार्थी विकास विषयक माहिती पाठविणेबाबत.**

**महोदय/महोदया,**

१) प्रतिवर्षी आपले महाविद्यालय/परिसंस्था/विभाग विद्यार्थी विकास विषयक अनेकविध योजना/उपक्रम राबविते. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका, निर्भय कन्या अभियान, आपत्ती व्यवस्थापन तसेच विद्यार्थी विकास मंडळाशी निगडीत विविध गुणदर्शनपर, व्यक्तिमत्त्व विकास पूरक, सांस्कृतिक स्वरूपाच्या अशा विविध योजना शैक्षणिक वर्ष २०१९–२० मध्ये देखील आपणांकडे यशस्वीरित्या राबविल्या गेलेल्या आहेत. आपण राबविलेल्या अशा वैशिष्टयपूर्ण उपक्रमांचे ठळक संकलन व आरेखन विद्यापीठस्तरावर व्हावे यासाठी याविषयी **विशेष उल्लेखनीय माहिती (१००० अक्षरांत), शिर्षकासह ४ छायाचित्रे (प्रत्येक छायाचित्र १ एम.बी.पर्यंत)** पुढील लिंकवर विहीत जागी **(www. unipune.ac.in – Students' Developement – BSD Online – College Login –For College Users – Login – Main Menu – Students Developement – Menu – Highlights of Students' Development Activities – शैक्षणिक वर्ष २०१९–२० मधील विद्यार्थी विकास मंडळाचा संक्षिप्त अहवाल)**

तसेच तत्पूर्वी याचठिकाणी आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागाचे **बोधचिन्ह (३०० के.बी.पर्यंत), मा. प्राचार्य, विद्यार्थी कल्याण अधिकारी आणि सांस्कृतिक समन्वयक यांचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (प्रत्येक छायाचित्र ३०० के.बी.पर्यंत)** अपलोड करण्याबाबत संबंधितांना सूचित करावे.

२) शैक्षणिक वर्ष २०१९–२० च्या उत्तरार्धापासून कोरोना विषाणूच्या उद्रेकामुळे आपली शैक्षणिक दैनंदिनी विस्कळीत झालेली आहे. तथापि या संकटातदेखील विद्यापीठ कार्यक्षेत्रातील शेकडो महाविद्यालयांच्या हजारो विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकीतून या संकटात अनेकविध समाजोपयोगी कामे केलेली आहेत. तद्वतच आपले महाविद्यालय/परिसंस्था/विभाग देखील या चळवळीत पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे. कोरोना विरूद्ध पुकारलेल्या या लढयातील आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा, राष्ट्रीय छात्र सेना तसेच इतर शैक्षणिक विभागातील सर्व आजी–माजी विद्यार्थी, संशोधक तसेच आपल्यासह आपले शिक्षक तथा शिक्षकेतर सेवक अशा सर्वांचा सहभागदेखील महत्वपूर्ण असून, भविष्यात पथदर्शी ठरणार आहे. याला अनुसरून कोरोना विरूद्धच्या लढयात आपल्या महाविद्यालयाचे योगदान महत्वपूर्ण **निवडक ६ छायाचित्रे शिर्षकासह (प्रत्येक छायाचित्र १ एम.बी. पर्यंत) तसेच संक्षिप्त माहिती (१००० अक्षरांत)** पुढील लिंकवर विहीत जागी **(www. unipune.ac.in – Students' Developement – BSD Online – College Login –For College Users – Login – Main Menu –Students Developement – Menu –Highlights of Students' Development Activities– कोरोना विरूद्धच्या लढयातील योगदान)** भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे.

सदर लिंक बुधवार, दिनांक ५ ऑगस्ट २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता कार्यान्वित होईल व मंगळवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०२० सायंकाळी ५.०० वाजता अनुपलब्ध होईल.

कळावे, ही विनंती.

संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ

**प्राचार्य,विद्यार्थी विकास अधिकारी व सांस्कृतिक अधिकारी फोटो**

सांस्कृतिक कार्यक्रम अधिकारी : --Select--

महाविद्यालयाचा लोगो : Choose File No file chosen

प्राचार्यांचा फोटो : Choose File No file chosen

विद्यार्थी विकास अधिकारी फोटो : Choose File No file chosen

सांस्कृतिक कार्यक्रम अधिकारी फोटो : Choose File No file chosen

**महाविद्यालय योजनेचे फोटो**

फोटो १ : Choose File No file chosen

फोटो २ : Choose File No file chosen

फोटो ३ : Choose File No file chosen

फोटो ४ : Choose File No file chosen

**योजनेबद्दल माहिती**

1000 Characters limit

Submit Clear